**वादी तर्फे साक्षीदार २ यांचा उर्वरीत उलटतपास प्र.वादी तर्फे एस.बी.खंजीरे यांचे तर्फे सुरु.**

नि.३६ वरील तथाकथीत करार लिहीन्यास कधी सुरु केला व कधी संपला याची वेळ त्यामध्ये नमुद केलेली नाही. तशी वेळ नमुद करण्यास मला अडचण नव्हती. हे खरे आहे की तथाकथीत करारपत्रात विवेक भूपाल कट्टी यांचा धंदा - नोकरी म्हणून नमुद केलेला आहे. हे खरे आहे की विवेक भूपाल कट्टी कोठे नोकरी करतात याची मला कल्पना नाही. हे मला माहिती नाही आंधेरी ते चर्च गेट या प्रवासासाठी दिड ते दोन तास लागतात. सरासरी शासकिय अथवा खाजगी कार्यालयाची सकाळी १० ते सायंकाळी ६ अशी असते. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी विवेक भूपाल कट्टी हे त्यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत हजर होते.

**प्रश्न** - विवेक भूपाल कट्टी त्यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत हजर होते याबाबत मी त्यांच्या कार्यालयात चौकशी केली काय ?

**उत्तर** – विवेक भूपाल कट्टी मला करारपत्राची माहिती दिली त्यानंतर ते काही वेळ बाहेर गेले, मला करार लिहीन्यास वेळ लागला व त्यानंतर ते आले.

हे खरे नाही की विवेक भूपाल कट्टी हे दिनांक ११/१०/२०१० रोजी त्यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत हजर होते. हे खरे नाही की विवेक भूपाल कट्टी यांनी माहिती दिली व त्यांच्या सांगण्याप्रमाणे नि. ३६ वरील करार लिहील्याचे खोटे सांगतो. हे खरे आहे की सामान्यता दिनांक ११/१०/२०१० रोजी इचलकरंजीत स्टॅँम्प घेवून त्याचदिवशी आंधेरीमध्ये करार करणे व्यवहारीक (प्रॅक्टीकली) दृष्टया शक्य नाही. मला याची कल्पना नाही की विवेक भूपाल कट्टी यांनी दिनांक ११/१०/२०१० रोजी इचलकरंजी मध्ये येवून कोणताही स्टॅँम्प खरेदी केलेला नाही. हे खरे नाही की दिनांक ११/१०/२०१० रोजी मी करारपत्र लिहीला व त्यावर विवेक भूपाल कट्टी यांनी सही केल्याचे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की मी संजय साळूंखे, विणा पाटील व इस्माईल पटेल मिळून निशाणी ३६ वरील बोगस करार तयार केलेला आहे. हे खरे आहे की नि. ३६ वरील करारावर राजू नेमिष्टे व कांबळे यांच्या सह्या नाहीत. हे खरे आहे की मला

राजू नेमिष्टे व कांबळे यांच्या सह्या घेण्यास अडचण नव्हती. हे खरे आहे की नि. ३६ वरील करार करण्यासाठी विवेक भूपाल कट्टी यांनी बोलावलेले नाही. हे खरे नाही की तथाकथीत करारापोटी वादीने विवेक कट्टी याला माझ्या व साक्षीदाराच्या समक्ष र.रु. २५,०००/– दिले हे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की यातील वादीला मदत करायची म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास नाही**

**उलटतपास पुर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/–

**(डॉ.डी.जी.पटवे )**

**दिनांक – १६/११/२०२४** **स.दि.न्या.क.स्तर, इचलकरंजी.**